क्रमांक-ऑनलाईनअर्ज/आधार क्रमांक/२०१६/तेवीस                                                                   दिनांक - १२ फेब्रुवारी, २०१८

# घो ष णा

## आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीतील प्रोफाईलमध्ये आधार कार्डची माहिती अनिवार्यपणे व अचुकतेने नोंदविणे

आयोगाच्या परीक्षांना बसणा-या उमेदवारांची ओळख पटविण्याकरीता उमेदवारांच्या प्रोफाईलमध्ये ‘आधार’ कार्ड विषयक तपशील नोंदविण्याची पद्धती व सुविधा मार्च, २०१७ पासुन लागु करण्यात आली आहे. त्यानुसार, नेहमीप्रमाणे उमेदवारांनी वैयक्तिक तपशिलामध्ये नोंदवावयाच्या माहिती व्यतिरिक्त, त्यांचे आधार कार्डमध्ये नोंदविल्याप्रमाणे नाव व आधार क्रमांक वेगळ्याने नोंदविणे बंधनकारक केलेले आहे. हे शक्य होण्यासाठी एप्रिल, २०१६ मध्येच आयोगाने घोषणा करुन उमेदवारांनी आधार कार्ड काढले नसल्यास ते काढण्यासाठी सुचना देवून पुरेसा अवधी दिला होता. मार्च, २०१७ पासुन प्रोफाईलमध्ये आधार तपशील नोंदविण्याची पद्धत लागु केल्यानंतरही असे आढळुन आले आहे की, (i) अद्यापही मोठ्या प्रमाणावर उमेदवारांनी प्रोफाईलमध्ये आधार तपशील नोंदविलेला नाही, (ii) मोठ्या संख्येने प्रोफाईल्स गत काही वर्षात वापरलेले (Log in केलेले) नाहीत, (iii) आधार तपशिल नोंदविलेल्यांपैकीही काही उमेदवारांचे प्रोफाईलमधील आधार तपशील UIDAI कडील तपशीलाशी जुळत नाहीत, (iv) प्रोफाईलमध्ये आधार विषयक तपशिलात नावाच्या स्पेलिंगमध्ये चुका आहेत, (v) प्रथम नाव, द्वितीय नाव व आडनाव यांचा क्रम आधार कार्डाप्रमाणे नोंदविलेला नाही, (vi) उमेदवारांचे लिंग (Gender) व जन्मदिनांक याचा तपशिल जुळत नाही इ.इ.

२. आयोगाच्या निवड प्रक्रियेत उमेदवारांची ओळख पटविणे महत्वाचे असल्याने सर्व उमेदवारांनी प्रोफाईलमध्ये आधार तपशिल नोंदविणे, तो अचुक असणे, व पडताळणीमध्ये तो UIDAI कडील माहितीशी जुळणे अत्यावश्यक आहे. एप्रिल, २०१६ मध्ये केलेल्या घोषणेत व मार्च, २०१७ मध्ये लागु केलेल्या कार्यपद्धतीत, ज्यांच्याकडे आधार क्रमांक नसेल, त्यांना आयोगाच्या पर्यायी ओळख प्रक्रियेतून जावे लागेल याची जाणीव करुन दिली होती व उमेदवारांनी आधार कार्ड नसल्यास ते त्यांनी वेळीच मिळविणे त्यांच्या हिताचे असल्याचे घोषित केले होते. **पर्यायी ओळख प्रक्रीयेत उमेदवाराला त्याच्या ओळखीचे विविध पुरावे** (ओळखपत्रे) **प्रमाणपत्रे इ. घेऊन आयोगाच्या मुंबईस्थित कार्यालयात समक्ष येणे अपेक्षित आहे**. ही गैरसोय टाळण्यासाठी जर अद्याप काही उमेदवारांनी आधार कार्ड घेतले नसल्यास त्यांनी ते तातडीने घ्यावे, व किमान आधार नोंदणी क्रमांक (Aadhar Enrolment Number) त्वरीत मिळवावा. आधार कार्ड मिळण्यासाठीच्या केंद्रांची यादी https://uidai.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३. ओळख पटविण्यातील संभाव्य गैरप्रकार रोखण्यासाठी आयोग लवकरच खालीलप्रमाणे उपाययोजना करणार आहे.

३.१ अलिकडील काळात वापर (Log in) न झालेले प्रोफाईल कायमस्वरुपी निष्क्रीय करणे.

३.२ आधार तपशील नसणारे प्रोफाईल निष्क्रीय करणे.

३.३ नवीन प्रोफाईल निर्मितीसाठी आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक अनिवार्य करणे.

३.४ प्रोफाईलमधील आधार तपशिल UIDAI कडील तपशिलाशी न जुळणा-या उमेदवारांना अथवा आधार तपशिल न देणा-या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे.

३.५ परीक्षा केंद्रावर उमेदवाराची ओळख पटविण्याची प्रक्रिया अधिक काटेकोर करणे.

४. आयोगाच्या परीक्षेस बनावट माहिती आधारे कोणलाही परीक्षा देता येवू नये म्हणून **सर्व उमेदवारांना पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत**.

४.१ आयोगाच्या परिक्षेस बसु इच्छिणा-या उमेदवारांनी अद्याप **आधार कार्ड** घेतले नसल्यास ते **त्वरीत घ्यावे** व **त्याचा तपशिल प्रोफाईलमध्ये** विहीत ठिकाणी **अचुकपणे नोंदवावा**.

४.२ आधार कार्ड मिळालेले नसल्यास, आधार नोंदणी क्रमांक (**Aadhar Enrolment Number**) प्रोफाईलमध्ये अचुकपणे **नोंदवावा**.

४.३ अलिकडील काळात प्रोफाईलचा वापर **(Login) केलेला नसल्यास** तो त्वरीत **आधार तपशिलासह** (मार्च,२०१७ मध्ये लागु केलेल्या प्रणालीत) **अद्ययावत करावा**.

४.४ ज्या उमेदवारांचा आधार कार्डवरील तपशिलच चुकीचा नोंदविला असेल त्यांनी नजिकच्या आधार केंद्रावर जावुन त्यात आवश्यक दुरुस्त्या वेळीच करुन घ्याव्यात.

४.५ ज्या उमेदवारांच्या प्रोफाईलमधील आधार विषयक तपशिल UIDAI कडील तपशिलाशी जुळलेला नाही, त्यांना आयोगामार्फत स्वतंत्रपणे त्यांचे प्रोफाईलमध्ये / नोंदणीकृत मोबाईलवर एस.एम.एस.द्वारे कळविण्यात येत आहे. त्यांनी त्यांच्या प्रोफाईलमधील **आधार विषयक तपशिल हा आधार कार्डावर नोंदविलेल्या तपशिलाप्रमाणेच**

**<u>नोंदवावा/दुरुस्त करावा</u>**. प्रथम नाव, द्वितीय नाव व आडनाव याचा क्रम, नावाचे स्पेलिंग इ. माहिती ही आधार कार्डावरील माहितीप्रमाणेच नेमकेपणाने नोंदवावी. **<u>ही कृती सात दिवसात पुर्ण करावी.</u>**

**४.६** ज्या उमेदवारांनी त्यांचा आधार क्रमांक एकापेक्षा अधिक प्रोफाईलशी जोडलेला असल्यास, त्यातील त्यांना हवा असलेला **<u>एकच प्रोफाईल</u>** (आधारशी जोडलेला) **<u>कायम ठेवावा व उर्वरित प्रोफाईल्स त्वरीत निष्क्रीय (Deactivate) करावेत</u>**. **<u>ही कृती सात दिवसात करावी</u>**. त्यानंतरही जर एकाच आधार क्रमांकाशी जोडलेले एकापेक्षा अधिक प्रोफाईल असतील तर त्यातील कोणताही एक प्रोफाईल वगळून उर्वरित प्रोफाईल्स कायमचे निष्क्रीय करण्याची कारवाई आयोगामार्फत केली जाईल. कोणत्याही उमेदवाराकडे एकच प्रोफाईल असणे अपेक्षित आहे. एकापेक्षा अधिक प्रोफाईल्स अनुज्ञेय नाही. उमेदवाराने वरील सुचनेप्रमाणे त्याचे अधिकचे प्रोफाईल निष्क्रिय करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी –

ज्या उमेदवारांनी त्यांचा आधार क्रमांक एकापेक्षा अधिक प्रोफाईल्सशी जोडलेला आहे, त्यांना याबाबत आयोगामार्फत स्वतंत्रपणे त्यांच्या नोदंणीकृत मोबाईलवर एस.एम.एस.द्वारे एकच प्रोफाईल Active ठेवण्याच्या कार्यवाहीबाबत कळविण्यात येत आहे. त्यांना त्यांच्या प्रोफाईलमध्ये लॉगइन केल्यानंतर, <u>वैयक्तीक माहितीमध्ये **१.१.३** येथे</u> त्यांचे एकाच आधार क्रमांकाशी जोडलेले एकापेक्षा अधिक प्रोफाईल्स दिसतील. त्यापैकी त्यांना भविष्यात न वापरावयाच्या प्रोफाईलसमोरील <u>De-Activate (५)</u> स्तंभाखालील <u>‘Yes’</u> **<u>Select करुन Update</u>** करावे. <u>ही कृती **७** दिवसांत करावी.</u>

**५.** उपरोक्त कार्यवाही करताना अडचणी आल्यास उमेदवाराने (१) आपले संपूर्ण नांव (२) युजर आयडी (३) आधार कार्डाची प्रत या माहितीसह ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळाच्या मुख्यपृष्ठावरील मे. महाऑनलाईन लिमिटेड यांच्या mpsc.support@mahaonline.gov.in या ईमेल आयडीवर अथवा suvidha.mahaonline.gov.in येथे आपले निवेदन प्रोफाईलमध्ये नोंदणी केलेल्या ईमेलवरुन पाठवावे. तसेच ऑनलाईन अर्जप्रणालीच्या Help Line क्रमांक ०२२-६१३१६४०२ वर सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत संपर्क साधावा.

**सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**